**पुणे मेट्रोची फंडिंग एजन्सी एएफडी ने  (Agence Française de Développement) 20 आणि 21 जुलै रोजी पुण्याला भेट दिली**

**निधी एजन्सी एएफडी ने पुणे मेट्रो प्रकल्पाला भेट दिली**

**एएफडी कर्जदाराने पुणे मेट्रो प्रकल्पाला भेट दिली आणि आढावा घेतला**

पुणे मेट्रोकडे पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट (११.४ किमी) आणि वनाझ ते रामवाडी (१५.७ किमी) असे दोन कॉरिडॉर आहेत. एकूण 33.2 किमी मार्गापैकी १२ किमीचे  (पिंपरी-चिंचवड मनपा ते फुगेवाडी आणि वनाज ते गरवारे महाविद्यालय) उद्घाटन माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ६ मार्च २०२२ रोजी नुकतेच करण्यात आले. उर्वरित २१.२ किमीचे काम जोरात सुरू आहे.

प्रकल्पाची एकूण किंमत रु. ११,४२० कोटी असून महा मेट्रोने दोन आंतरराष्ट्रीय निधी संस्थांकडून कर्ज घेतले आहे. एएफडी (Agence Française de Développement) फ्रान्स आणि EIB (युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँक).

एएफडी फ्रान्सने प्रकल्पासाठी रीच ३ वायडक्ट, ट्रॅक्शन आणि ऑक्झिलरी पॉवर सप्लाय, OHE, सिग्नलिंग, टेलिकॉम, लिफ्ट्स आणि एस्केलेटर, पर्यावरण नियंत्रण प्रणाली (ECS), टनेल व्हेंटिलेशन सिस्टम (TVS) आणि रेलसाठी निधी दिला आहे. सर्व मिळून एएफडी ने रु. १६६९.५५ कोटी पुणे मेट्रो प्रकल्पासाठी दिले आहेत. एएफडी ने महा मेट्रो द्वारे राबविण्यात येत असलेल्या नागपूर मेट्रो प्रकल्पाला देखील निधी दिला आहे. पुणे मेट्रो आणि एएफडी फ्रान्स यांच्यातील संबंध सातत्याने वाढत आहेत.

भारतातील फ्रेंच राजदूत एच.ई. श्री इमॅन्युएल लेनन ६ मार्च २०२२ रोजी पुणे मेट्रोच्या उद्घाटनावेळी उपस्थित होते.

श्रीमती सेतारेह अतायन, टास्क टीम लीडर आणि श्री रजनीश आहुजा, प्रोजेक्ट लीडर एएफडी इंडिया यांच्या नेतृत्वाखालील एएफडी टीमने प्रकल्पाचा आढावा घेण्यासाठी २० आणि २१ जुलै २०२२ रोजी पुणे मेट्रोला भेट दिली.

टीमने पिंपरी-चिंचवड मनपा स्टेशनला भेट दिली आणि पिंपरी-चिंचवड मनपा ते फुगेवाडी असा प्रवास केला. पिंपरी-चिंचवड मनपा ते निगडी लाईनच्या विस्ताराबाबतही टीम उत्सुक होती.

एएफडी टीमने सिविल कोर्ट कार्यालय, मेट्रो अलाइनमेंटसह मुठा नदीचा किनारा, भूमिगत विभाग आणि वनाझ आणि रेंज हिल कार डेपोलाही भेट दिली.

मेट्रो अधिकाऱ्यांनी एएफडी टीमला महा मेट्रो, मल्टी-मॉडल इंटिग्रेशन (MMI), आणि O&M अंमलबजावणी द्वारे घेतलेल्या सामाजिक आणि पर्यावरणीय पुढाकाराबद्दल माहिती दिली. महा मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी भाडे व्यतिरिक्त येणाऱ्या महसूल प्रणालीचे आणि महा मेट्रोने केलेल्या नियोजनाची माहिती दिली.



